Maharashtra State Board
of
Secondary & Higher
Secondary Education
Kolhapur Divisional Board
Kolhapur-416004

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व
उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ,
कोल्हापूर-४१६००४

Ph No. 0231-2696101/2/3 WebSite : www.sscboardkolhapur.in Email: divsec.kop@gmail.com

क्र. कोविमं/डी.पी./मुख्या.सभा/4136
दिनांक : 24 NOV 2025

प्रति,

सर्व मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व मान्यताप्राप्त शाळा व क.महाविद्यालये,
सातारा, सांगली व कोल्हापूर.

**विषय: फेब्रु.-मार्च २०२६ परीक्षेच्या अनुषंगाने बोर्ड परीक्षेचा राजमार्ग उपक्रमांतर्गत मुख्याध्यापक / प्राचार्य ऑनलाईन सभेबाबत..**

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, सर्व मान्यताप्राप्त शाळांचे मुख्याध्यापक व कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य यांची **बुधवार, दि.२६.११.२०२५ रोजी दुपारी २.००वा.** आढावा सभा आयोजित करण्यात येत आहे. सदर ऑनलाईन सभेची लिंक आपणास यथावकाश कळविण्यात येईल.

तरी सदर ऑनलाईन सभेसाठी उपस्थित होत असताना सोबत सादर करण्यात आलेल्या विषयपत्रिकेनुसार माहिती तयार ठेवण्यात यावी, ऑनलाईन सभेमध्ये कोणत्याही शाळा / क.महाविद्यालयास माहितीबाबत विचारणा करण्यात येईल. सबब आपण स्वत: परिपूर्ण माहितीसह ऑनलाईन बैठकीसाठी जॉईन व्हावे

**विषयपत्रिका**

| अ.क्र | विषय |
|---|---|
| १ | माहे जून ते नोव्हेंबर अखेर पर्यंतचे प्रशासकीय शैक्षणिक व विशेष उपक्रमांचा आढावा |
| २ | इ.१०वी व इ.१२वी परीक्षेचे व्दितीय गुणपत्रक / प्रमाणपत्र, तात्पुरते प्रमाणपत्र व स्थलांतर प्रमाणपत्र RFP प्रक्रियेव्दारे ऑनलाईन प्रणालीमधून देणेबाबत. |
| ३ | इ.१०वी फेब्रु.-मार्च २०२६ चित्रकला, शास्त्रीय कला, लोककला, एन.सी.सी. व स्काऊट गाईडचे प्रस्ताव ऑनलाईन सादर करणेबाबत. |

**(सुभाष रा.चौगुले)**
**विभागीय सचिव,**
**कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर**

**प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव -**

१. विभागीय शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर - उपरोक्त ऑनलाईन सभेत आपण स्वत: जॉईन व्हावे.
२. सर्व शिक्षणाधिकारी (माध्य.), जिल्हा परिषद, सातारा, सांगली व कोल्हापूर - उपरोक्त मुख्याध्यापक / प्राचार्य सभेबाबत आपल्यामार्फत सर्व माध्यमिक शाळा व क.महाविद्यालयांना कळविण्यात यावे व आपण स्वत: जॉईन व्हावे.

**सूचना** - इ.१०वी व इ.१२वीसाठी शिकविणाऱ्या शिक्षकांनी शाळा / क.महाविद्यालयामधून एकाच डिव्हाईसमधून सदर सभेसाठी जॉईन व्हावे.

# पडताळा सूची - प्रशासकीय कामकाज

| अ.क्र. | विषय | होय / नाही | शेरा (अपुर्ण असल्यास कधीपर्यंत पुर्ण होईल) |
|---|---|---|---|
| १ | फेब्रु.-मार्च २०२५ परीक्षेची सर्व विद्यार्थ्यांची गुणपत्रके वाटप केली का ? अद्याप गुणपत्रक किती विद्यार्थ्यांनी घेतलेले नाहीत ? | | |
| २ | शाळाचे / क.महाविद्यालयाचे प्रोफाईल ऑनलाईन भरली का ? | | |
| ३ | शाळेचे / क.महाविद्यालयाचे ऑनलाईन शिक्षण संक्रमण व नोंदणी शुल्क भरले का ? | | |
| ३ | शाळेचे / क.महाविद्यालयाचे सांकेतांक नूतनीकरण कार्यवाही केली का ? | | |
| ४ | आपल्या शाळेतील / क.महाविद्यालयातील शिक्षकांची अद्यावत माहिती शिक्षक पॅनलमध्ये भरली का ? शिक्षक पॅनल माहिती बोर्डाकडे जमा केली का ? | | |
| ५ | इ.१०वी व इ.१२वीच्या किती खाजगी विद्यार्थ्यांची नोंदणी आपल्या शाळा / क.महाविद्यालयातून झाली ? | | |
| ६ | इ.१०वी व इ.१२वी दिव्यांग विद्यार्थ्यांचे प्रस्ताव मंडळास सादर केले का ? किती दिव्यांग विद्यार्थ्यांचे प्रस्ताव सादर केले किंवा करावयाचे आहेत ? | | |
| ७ | सर्व विद्यार्थ्यांचे आवेदनपत्रे नियमित शुल्कासह भरले का ? किती विद्यार्थ्यांचे नियमित शुल्कासह आवेदनपत्रे भरलेली आहेत ? आवेदनपत्र भरणे प्रलंबित असल्यास त्याची कारणे कोणती ? | | |
| ८ | इ.१२वी योग्यता प्रमाणपत्राचे प्रस्ताव ऑनलाईन सादर केले का ? किती विद्यार्थ्यांचे योग्यता प्रमाणपत्र प्रस्ताव सादर केले ? | | |
| ९ | इ.१०वी व इ.१२वी परीक्षा केंद्रांनी सर्व भौतिक व वर्ग खोल्यामध्ये CCTV सह सर्व तांत्रिक सुविधांची पुर्तता केली काय ? | | |
| १० | फेब्रु.-मार्च २०२५ परीक्षेची सर्व विद्यार्थ्यांची प्रमाणपत्रे वाटप केली का ? अद्याप प्रमाणपत्रे किती विद्यार्थ्यांनी घेतलेले नाहीत ? ज्या विद्यार्थ्यांनी प्रमाणपत्रे घेतलेले नाहीत अशा सर्व विद्यार्थ्यांशी संपर्क साधण्यात आला का ? | | |
| ११ | इ.१०वी व इ.१२वी फेब्रु.-मार्च २०२६ परीक्षेच्या प्रि-लिस्ट तपासणी व दुरुस्त्या केल्या का ? | | |
| १२ | इ.१०वी फेब्रु.-मार्च २०२६ चित्रकला, शास्त्रीय कला, लोककला, एन.सी.सी. व स्काऊट गाईडचे प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने दि.१७.११.२०२५ पासून मंडळाकडे सादर करावयाचे आहेत त्याबाबतची कार्यवाही आपल्याकडून सुरु आहे का ? | | |

# पडताळा सूची - शैक्षणिक कामकाज

| अ.क्र. | विषय | होय / नाही | शेरा (अपुर्ण असल्यास कधी होईल याबाबत नियोजन) |
|---|---|---|---|
| १ | फेब्रु.-मार्च २०२५ परीक्षेचे गुणपत्रके व इतर रेकॉर्ड जतन करुन ठेवले का ? | | |
| २ | नवीन शैक्षणिक वर्षाचे परीक्षाविषयक नियोजन केले का ? | | |
| ३ | पुढील परीक्षेसाठी रिपीटर विद्यार्थ्यांची माहिती घेतली का ? | | |
| ३ | फेब्रु.-मार्च २०२५ परीक्षेच्या निकालाचे विश्लेषण केले का ? | | |
| ४ | विद्यार्थ्यांचे नाव, जन्म तारीख दुरुस्तीबाबत विहित मार्गाने प्रस्ताव सादर केले का ? | | |
| ५ | नवीन विषय मान्यतेचा प्रस्ताव सादर केले का ? | | |
| ६ | नवीन शैक्षणिक वर्षामध्ये अध्यापनाचा गतिमान आरंभ केला का ? | | |
| ७ | फेब्रु.-मार्च २०२५ परीक्षेतील विद्यार्थ्यांची तोंडी व प्रात्यक्षिक गुणांची लेखी परीक्षेतील गुणांची तुलना व विश्लेषण करुन त्यानुसार चालू परीक्षेसाठी सकारात्मक उपाययोजना केल्या का ? | | |
| ८ | मंडळाच्या शिक्षण संक्रमणामधील लेखांचे वाचन व त्यानुसार कार्यवाही केली का ? | | |
| ९ | आवेदन पत्र भरण्याचा सराव (ऑनलाईन टेंम्प्लेट) करुन घेतला का ? | | |
| १० | विद्यार्थ्यांना स्वयंमूल्यमापनाची सवय लावण्यासाठी उपाययोजना केल्या का ? | | |
| ११ | प्रथम सत्र परीक्षेच्या निकालाचे विश्लेषण करुन उपचारात्मक अध्यापनाचे नियोजन केले का ? | | |
| १२ | SCERT, पुणे यांच्या संकेतस्थळावरील व SCERT ने उपलब्ध करुन दिलेल्या डिजीटल साहित्याचा वापर केला का ? | | |
| १३ | पाठ्यक्रम आढावा घेतला का ? | | |
| १४ | प्रात्यक्षिक, प्रकल्प, तोंडी परीक्षा, अंतर्गत मुल्यमापन परीक्षेची तयारी केली का? | | |
| १५ | सराव प्रश्नपत्रिका सोडवून घेतल्या का व त्यानुसार उपचारात्मक अध्यापन केले का ? | | |

# पडताळा सूची - विशेष उपक्रम

| अ.क्र. | विषय | होय / नाही | शेरा (अपुर्ण असल्यास कधी होईल याबाबत नियोजन) |
|---|---|---|---|
| १ | अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले का ? | | |
| २ | विद्यार्थ्यांना करिअर विषयक मार्गदर्शन केले का ? | | |
| ३ | मंडळाच्या शिक्षासूचीचे वाचन व उत्तरपत्रिकेच्या पृष्ठ क्र.०२ वरील सुचनांचे विद्यार्थ्यांच्या समोर वाचन केले का ? | | |
| ३ | विद्यार्थी व पालक यांना मंडळाचे ॲप व संकेतस्थळाबाबत मार्गदर्शन केले का ? | | |
| ४ | अभ्यासामध्ये मागे पडलेल्या विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन केले का ? | | |
| ५ | पालक सभा अध्ययन नियोजन व आहाराबाबत मार्गदर्शन केले का ? | | |
| ६ | विद्यार्थ्यांच्या आहार व आरोग्य विषयक मार्गदर्शन शिबीर घेतले का ? | | |
| ७ | मोबाईलचे दुष्परिणाम व मर्यादित वापर यावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले का ? | | |
| ८ | कॉपीमुक्त परीक्षेची शपथ विद्यार्थ्यांना दिली का ? | | |
| ९ | ताणतणाव व्यवस्थापनाबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले का ? | | |
| १० | तज्ज्ञांचे मार्गदर्शन, व्याख्यान आयोजित केले का ? | | |
| ११ | विद्यार्थ्यांना उत्तपत्रिका लेखनाबाबत मार्गदर्शन केले का ? | | |